# प्रस्तावना

# प्रस्तावना

लोकशाहीचा विकास होण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांचे महत्व अनन्यसाधारण आहे. लोकोपयोगी सुविधांची निर्मिती व त्यांचे वाटप न्याय्य व कार्यक्षमरित्या होण्यासाठी त्यांच्या देखभालीची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थांकडेच असणे व्यवहार्य व आवश्यक मानले गेले आहे. स्वातंत्र्यानंतरच्या नव्या धोरणानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांचे महत्व व राष्ट्राच्या विकास कामातील त्यांची भूमिका महत्वपूर्ण आहे.

मुंबई येथे डिसेंबर १९८७ मध्ये संपन्न झालेल्या अखिल भारतीय महापौर परिषदेमध्ये घटक राज्य सरकारांचा स्थानिक स्वराज्य संस्थांकडे पाहण्याचा दृष्टिकोन हा नकारात्मक असल्याची टिका करण्यात आली. राज्यसूचिमधून स्थानिक स्वराज्य संस्थांचा विषय वगळून तो सामायिक सूचिमध्ये समाविष्ट करावा त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कारभारात केंद्र सरकारलाही स्वत:ची भूमिका बजावता येईल अशी मागणी करण्यात आली. खरे तर पंचायत राज संस्था काय किंवा स्थानिक स्वराज्य संस्था काय यांचा उपयोग राज्य सरकारे स्वत:च्या हित-संबंधानुसार करून घेत असतात. तसे पाहिले तर राज्य सरकार किंवा केंद्र सरकार यांच्या हस्तक्षेपाशिवाय स्थानिक स्वराज्य संस्थांची स्वायतत्ता ही अधिक महत्वाची मानली पाहिजे.

स्वातंत्र्यानंतर देशामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये त्या अधिक लोकाभिमुख व्हाव्यात म्हणून नवे प्रयोग करण्यात आले. स्थानिक स्वराज्य संस्थांची दोन पातळ्यांवर प्रशासकीय विभागणी करण्यात आली. ग्रामीण भागामध्ये पंचायत राज संस्था आणि शहरासाठी महानगरपालिका आणि नगरपालिका अशी प्रशासकीय व्यवस्था निर्माण करण्यात आली. वाढत्या औद्योगिकरणामुळे आणि विविध विकास कार्यक्रमामुळे भारतीय समाज बदलत होता. आज शहरी समाजाच्या बदलत्या महत्वाकांक्षा आणि गरजांच्या प्रचंड रेटयामुळे नगरपालिका प्रशासनाची रचना व त्यांच्या समोरील प्रश्नांचे स्वरूप आमूलाग्रपणे बदलले आहे.

१९८१ च्या जनगणनेतील आकडेवारीकडे पाहिल्यास शहरी लोकसंख्या वाढीचा वेग प्रचंड आहे हे लक्षात येते. १९०१ मध्ये २५.६ दशलक्ष लोकसंख्या नागरी विभागात तर १९८१ मध्ये १५६.१ दशलक्ष लोकसंख्या नागरी विभागात रहात होती. देशातील (१९६१ ते १९७१ या काळातील) १८ घटक राज्यांच्या शहरीकरणाशी तुलना करता महाराष्ट्र राज्याचे शहरीकरण सर्वोच्च असल्याचे आढळते. १९६१ मध्ये महाराष्ट्रात शहरीकरणाचा वेग २८.२२ टक्के एवढा तर १९७१ मध्ये ३१.७० टक्के होता. भारतातील शहरी लोकसंख्या वाढीचा वेग नेमक्या याच कालावधीत ३७.८३ टक्के आहे. महाराष्ट्राच्या शहरी लोकसंख्या वाढीचा वेग त्याहूनही अधिक म्हणजे ४०.६८ टक्के आहे. महाराष्ट्र राज्य शहरीकरणाच्या भोवऱ्यात वेगाने गुरफटले जात आहे हे या आकडेवारीवरून स्पष्ट होते.

महाराष्ट्रातील शहरीकरणाच्या वेगामुळे निर्माण झालेल्या वेगवेगळया नागरी समस्यांची सोडवणूक करण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांचा विस्तारही मोठा करण्यात आलेला आहे. सध्या महाराष्ट्रात ' अ ' वर्ग नगरपालिका २२, ' ब ' वर्ग नगरपालिका ४४ आणि ' क ' वर्ग नगरपालिका १४५ आहेत. महानगरपालिकांची संख्या आता ११ पेक्षा अधिक झाली आहे.

या पार्श्वभूमीवर या लघुप्रबंधाचा विषय असलेल्या वाई नगरपालिकेचा समावेश ' क ' वर्ग नगरपालिकांच्या गटामध्ये होतो. महाराष्ट्रातील जुन्या नगरपालिकांमध्ये वाई नगरपालिकेचा अंतर्भाव करावा लागेल. वाई नगरपालिकेची स्थापना ब्रिटिश राजवटीत ५ डिसेंबर १८५५ मध्ये झाली. त्या अगोदर महाराष्ट्रात केवळ चौदा नगरपालिका कार्यरत होत्या. महाराष्ट्रातील नगरपालिकांचे कार्य महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५ नुसार सीमित करण्यात आले आहे.

या शोध निबंधासाठी " वाई नगरपालिका : पाणी पुरवठा आणि आरोग्य सेवा - एक अभ्यास " हा विषय निवडण्यामागे उद्देश असा की, कोणत्याही

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

SHIVAJI UNIVERSITY
LIBRARY
KOLHAPUR

शहराच्या लोकोपयोगी सुविधांमध्ये पाणी पुरवठा व आरोग्य सेवा यांना विशेष महत्व असते. वाई नगरपालिकेच्या कार्यांमध्ये आवश्यक समजल्या जाणाऱ्या सेवा अपुऱ्या पडत आहेत असे निदर्शनास आले आहे. प्रस्तुत लघुप्रबंधात तीन महत्वाच्या प्रश्नांचा मागोवा घेण्यात आला आहे. एक, वाई शहरामध्ये कोणते पाणी पुरवठा आणि आरोग्य सेवा विषयक प्रश्न आहेत. दोन, या दोन सेवांची नागरिकांना पूर्तता करण्यासाठी नगरपालिकेने कोणते आर्थिक व प्रशासकीय प्रयत्न केले आहेत. आणि तीन, या दोन्ही प्रश्नांची चर्चा करून वाई नगरपालिकेच्या कार्यपध्दतीतील त्रुटींचा आवश्यक उपाययोजना सुचवून विचार केलेला आहे.

या शोध निबंधाच्या पहिल्या प्रकरणामध्ये भारतातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विकासाचा मागोवा घेतलेला आहे. १६८७ मध्ये देशातील पहिल्या मद्रास कार्पोरेशनची स्थापना झाली तेंव्हापासून ते ब्रिटिश राजवटीत या संस्थांचा झालेल्या विकासाचा आढावा घेतलेला आहे. तसेच स्वातंत्र्य लढयामुळे या संस्थांच्या रचना, अधिकार व जबाबदारीत झालेले बदल यांचेही विवेचन केलेले आहे. विशेषत: महाराष्ट्रातील नगरपालिकांच्या संरचना आणि विविध विषय समित्यांना पार पाडाव्या लागणाऱ्या कार्यांचा उल्लेख केलेला आहे.

दुसऱ्या प्रकरणामध्ये वाई शहराच्या व परिसराच्या ऐतिहासिक व भौगोलिक रचनेविषयी चर्चा केली आहे. वाई शहर हे प्राचीन व सनातनी देखील आहे. किमान दोन हजार वर्षांपूर्वी हे गाव वसलेले असावे असे पुरावे मिळतात. मुघल साम्राज्य, शिव काल, पेशवाईत वाईचा झालेला विकास, ब्रिटिश व स्वातंत्र्यानंतरच्या काळाचा प्रभाव वाई शहरावर आहे.

वाईचे हवामान, लोकसंख्या, कृष्णा नदी, याबद्दलची माहिती सदर प्रकरणामध्ये दिलेली आहे.

तिसऱ्या प्रकरणामध्ये वाई नगरपालिकेच्या रचनेविषयी विवेचन केलेले आहे. प्रतिनिधीत्व, मतदानाचा हक्क, निवडणूका व विविध विषय समित्यांच्या रचनेविषयी माहिती दिलेली आहे.

चौथ्या प्रकरणामध्ये वाई नगरपालिकेच्या पाणी पुरवठा सेवेविषयी चर्चा केलेली आहे. नगरपालिकेने पाणी पुरवठयाबाबत केलेले प्रयत्न, नागरिकांच्या अपु-या, अस्वच्छ व अशुध्द पाणी पुरवठयाबाबतच्या तक्रारी, नगरपालिकेने दिलेली घरगुती नळ कनेक्शन्स, पाणी पुरवठयासाठी अंदाजपत्रकीय तरतुदी आणि नागरिकांनी दिलेला प्रतिसाद इत्यादी विविध पैलूंचा अभ्यास या प्रकरणामध्ये आहे.

पाचव्या प्रकरणामध्ये वाई नगरपालिकेच्या आरोग्य सेवेविषयी विश्लेषण केलेले आहे. आरोग्य सेवेअंतर्गत नगरपालिकेला विविध कामे पार पाडावी लागतात. नगरपरिषदेचे प्रयत्न, आरोग्य सेवेवरील ताण, तिचा अपुरेपणा, कर्मचा-यांची संख्या अशा विविध अडचणी दूर करण्यासाठी नगरपालिकेने प्रयत्न केले आहेत का या विविध बाबींचा परामर्श इथे घेण्यात आला आहे.

वरील प्रकरणांच्या तपशीलातून शेवटच्या प्रकरणामध्ये काही निष्कर्ष व सूचनांची मांडणी केली आहे.

या प्रबंधासाठी अभ्यासपध्दती ही ऐतिहासिक पध्दतीची निवड केली आहे. वाई शहरातील पाणी पुरवठा आणि आरोग्य सेवेचे आज निर्माण

झालेले प्रश्न हे कृष्णा नदीच्या पाण्याशी निगडीत आहेत. कारण वाई शहराला होणारा पाणी पुरवठा हा प्रारंभापासून कृष्णा नदीतून होतो आहे. या नैसर्गिक पाणी पुरवठयाच्या शास्त्रीय वाटपासाठी नगरप्रशासनाने कोणते संरचनात्मक मार्ग स्विकारले याचाही अभ्यास महत्वाचा होता. म्हणून या लघुप्रबंधामध्ये नगरपालिकेने वेळोवेळी प्रसिध्द केलेले वार्षिक अहवाल, शताब्दी महोत्सव स्मृतिग्रंथ (१९५८-५९), नगरपालिकेची अंदाजपत्रके, समावृत्तांत, नगरपालिका दवाखान्यातील नोंदींचा आधार घेतलेला आहे. याशिवाय नगरपालिकेच्या

कार्यालयांतील अप्रकाशित नोंदींचाही आधार घेऊन माहिती अद्यावत व विश्वासार्ह करण्याचा प्रयत्न केलेला आहे. नगरपालिकेतील संबंधित विभागातील अधिकारी, कर्मचारी तसेच नगरपालिकेच्या आजी-माजी पदाधिकाऱ्यांशी औपचारिक व अनौपचारिक चर्चेतून मिळालेल्या माहितीचा समावेश प्रबंधामध्ये केलेला आहे. पाणी पुरवठा व आरोग्य सेवेच्या वस्तुनिष्ठ माहितीची जाणीव व्हावी म्हणून छायाचित्रांचाही आधार घेतलेला असून शेवटी स्वत: अभ्यासक गेली सात वर्षे वाईचा रहिवासी असल्यामुळे त्याच्या स्वत:च्या अनुभव व निरीक्षणांचाही आधार म्हणून उपयोग केला आहे.